# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

## राज्य व अ.भा. पातळीवरील स्पर्धेच्या मान्यतेसाठी अर्ज

मा. सरकार्यवाह,
महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन
शिवाजी पार्क, दादर,
मुंबई - ४०० ०२८.

महोदय,

आमच्या संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कबड्डी स्पर्धेला मान्यता मिळावी ही विनंती. स्पर्धा मान्यतेसाठी आवश्यक ती माहिती खाली दिली आहे.

१. स्पर्धा भरविणाऱ्या संस्थेचे नांव :

२. पत्ता :

३. संस्थेची स्थापना :

४. संस्थेच्या सभासदांची संख्या :

अध्यक्ष :

चिटणीस :

५. संस्था रजिस्टर आहे का ? : होय/नाही

६. स्पर्धेचा प्रकार : राज्य पातळी / अ.भा. पातळी / राज्य अजिंक्यपद

स्पर्धा गट : पुरुष गट /महिला गट / वजनी गट (कुमार-किशोर) / व्यावसायिक गट

संघांची संख्या : पुरुष / मुले महिला / मुली

७. स्पर्धेचा कालावधी : दिनांक ते

८. संस्थेचे स्वतःचे क्रिडांगण आहे का ? : होय/नाही

९. स्पर्धा होणाऱ्या क्रिडांगणाचे नांव :

पत्ता :

१०. स्पर्धेसाठी क्रिडांगणाची संख्या :

११. संस्थेकडे स्वतःचे पंच किती : राज्य पंच संख्या अ.भा.पंच संख्या

वरील सर्व माहिती खरी असून महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांनी स्पर्धेसाठी बनविलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची आम्ही हमी देत आहोत.

स्पर्धा भरविणाऱ्या संस्थेचा शिक्का प्र. कार्यवाह अध्यक्ष

Scanned with CamScanner

50)

________________ संघ / संस्था आमच्या जिल्हयाला संलग्न असून संस्थेतर्फे दिलेली माहिती बरोबर आहे. ह्या स्पर्धेला मान्यता देण्याची शिफारस करीत आहोत.

________________ जिल्हा असोसिएशनचा शिक्का

सही

अध्यक्ष / कार्यवाह
________________ जिल्हा कबड्डी असोसिएशन

---

स्पर्धेसाठी मान्यता शुल्क व कॅपिटेशन फी रुपये अर्जासोबत मिळाली. शुल्क मिळाल्याचे पावती क्रमांक दिनांक स्पर्धेला मान्यता देण्यात आली आहे.

सरकार्यवाह
महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

संलग्न : भारतीय हौशी कबड्डी महासंघ - महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन

नोंदणी क्रमांक : एफ्. ६२६ (मुंबई) व मुंबई २१/१९५६ जी.बी.बी.एस्.डी.



कार्यालय : शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२८. संपर्क - २४४४८४९४ # फॅक्स २४४४२३३०

Email :maharashtra.kabaddi@gmail.com Web. : www.maharashtrakabaddi.com



आजीव अध्यक्ष :
शरद पवार

प्रमुख आश्रयदाते :
अजित पवार

अध्यक्ष :
किशोर पाटील

उपाध्यक्ष :
संभाजी पाटील
राम मोहिते
बबनराव लोकरे
बाबुराव चांदेरे
किरण पावसकर

कार्याध्यक्ष :
दत्ता पाथ्रीकर

प्रभारी सरकार्यवाह :
संभाजी पाटील

खजिनदार :
शांताराम जाधव

संयुक्त कार्यवाह :
सुनिल जाधव
मंगल पांडे
उत्तमराव इंगळे
मुजफ्फर अली सय्यद
प्रकाश बोराडे


संदर्भ क्र.: एम.एस.के.ए./ दिनांक :

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा मान्यतेसाठी अटी व नियम पत्रक

१. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची मान्यता घेताना राज्य संघटनेची स्पर्धा मान्यता वर्गणी राज्य संघटनेच्या नियमानुसार भरावी लागेल.

२. स्पर्धा आयोजित करणाऱ्या संस्थेला स्पर्धा नियोजन वर्गणी (रॉयल्टी), खेळाडू निधी व स्पर्धा मान्यता वर्गणी रु.५००/- व स्पर्धेत खेळणारे संघ x रु.१२ सहभाग वर्गणी त्याचप्रमाणे जिल्हा असोसिएशनची मान्यता वर्गणी भरून सोबत जोडलेल्या स्पर्धा मान्यता अर्जावरील संपूर्ण माहिती भरून देणे आवश्यक आहे. अर्जावर कार्यवाह सही व जिल्हा असोसिशनचा शिक्का असणे जरुरीचे आहे.

३. स्पर्धा भारतीय कबड्डी महासंघाच्या प्रचलीत नियमानुसार साखळी व बाद पद्धतीने खेळविल्या जातील.

४. पुरुष व महिला गटासाठी आवश्यक क्रीडांगणे बनवावीत. ध्वनीक्षेपकासह योग्य विद्युत पुरवठा असावा.

५. व्यासपिठावरील बॅनरवर व प्रवेश अर्जावर जिल्हा व राज्य संघटनेच्या मान्यतेचा उल्लेख असावा.

६. स्पर्धेत सहभागी होणारे संघ व संघातील खेळाडूंची राज्य संघटनेच्या नियमानुसार नोंद होणे आवश्यक आहे.

७. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना रेल्वे सवलती प्रमाणे दुसऱ्या वर्गाचे १२ खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक याप्रमाणे १४ जणांचे प्रवास भाडे आरक्षण शुल्कासहित संयोजकांना द्यावे लागेल. जेथे रेल्वे प्रवास उपलब्ध नसेल अशा ठिकाणच्या संघास एस.टी. बसचे दोन्ही बाजूचे प्रवास भाडे रोख द्यावे लागेल.

८. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या निरीक्षक, पंचप्रमुख, पंच, प्रशिक्षक, व्यवस्थापक व खेळाडूंची निवास व भोजनाची व्यवस्था संयोजकांना विनामुल्य करावी लागेल.

९. स्पर्धेत देण्यात येणारी रोख पारितोषिके व चषक यांचा स्पष्ट उल्लेख प्रवेश अर्जातील परिपत्रकावर करणे आवश्यक आहे. रोख पारितोषिकांची रक्कम धनादेश न देता रोख स्वरूपातच देण्यात यावी. जर तृतिय क्रमांकाचा सामना खेळविला जाणार नसेल तर उपांत्य फेरीतील दोन्ही उपविजेत्या संघांना समान पारीतोषिके रोख रकमेच्या स्वरुपात द्यावीत. तसेच पुरूष व महिला संघाना समान पारितोषिके (रोख रक्कम व इतर) देण्यात यावी त्यात तफावत असता कामा नये. तसेच दैनंदिन पारितोषिक असल्यास तीसुद्धा रोख द्यावीत.

१०. राज्यस्तरीय स्पर्धेस राज्य संघटनेने नियुक्त केलेल्या निरीक्षक व पंचप्रमुख यांना प्रथम वर्गाचे रेल्वे किंवा खाजगी बस भाडे, दैनंदिन भत्ता रु.८००/- व नैमितिक भत्ता रु.८००/-(संपूर्ण स्पर्धेकरीता) प्रमाणे. तसेच नियुक्त केलेल्या पंचाना रेल्वे किंवा एशियाड बसचे येण्या-जाण्याचे प्रवास भाडे (आरक्षणासह) द्यावे लागेल. त्याचप्रमाणे दैनंदिन भत्ता रु.६००/- व नैमितिक भत्ता रु.६००/-(संपूर्ण स्पर्धेकरीता) प्रमाणे. त्याशिवाय निरीक्षक, पंचप्रमुख व पंच यांचा प्रवास २०० किलो मीटरपेक्षा जास्त असेल तर अधिक एक दिवसाचा दैनंदिन भत्ता द्यावा लागेल. या व्यतिरिक्त स्पर्धा एका दिवसात दोन सत्रात झाल्यास निरीक्षक व पंचप्रमुख यांस त्या सत्राचे अधिक रु.४००/- आणि पंचास अधिक रु.३००/- देण्यात यावे. निवास व भोजन व्यवस्था संयोजकातर्फे विनामुल्य करावी लागेल जर भोजन व्यवस्था नसल्यास प्रतिदिन प्रत्येकी रु.३००/- प्रमाणे भोजन भत्ता द्यावा लागेल.

११. खेळाडूंचे प्रवास भाडे साखळी सामने ज्या दिवशी संपतील त्या दिवशी द्यावे लागेल. निरीक्षक, पंचप्रमुख, सहाय्यक पंचप्रमुख, पंच व पदाधिकाऱ्यांचे प्रवास भाडे व मानधन पारितोषिक वितरण समारंभाच्या आदल्या दिवशी द्यावे लागेल.

१२. क्रीडांगणावर प्रथमोपचाराची व्यवस्था रुग्णवाहिकेसहित असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन दादर मुंबई २८.

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

संलग्न : भारतीय हौशी कबड्डी महासंघ - महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन

नोंदणी क्रमांक : एफ्. ६२६ (मुंबई) व मुंबई २१/१९५६ जी.बी.बी.एस्.डी.

कार्यालय : शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२८. संपर्क - २४४४८४९४ # फॅक्स २४४४२३३०

Email :maharashtra.kabaddi@gmail.com Web. : www.maharashtrakabaddi.com

आजीव अध्यक्ष :
शरद पवार

प्रमुख आश्रयदाते :
अजित पवार

अध्यक्ष :
किशोर पाटील

उपाध्यक्ष :
संभाजी पाटील
राम मोहिते
बबनराव लोकरे
बाबुराव चांदेरे
किरण यावलकर

कार्याध्यक्ष :
दत्ता पाथ्रीकर

प्रभारी सरकार्यवाह :
संभाजी पाटील

खजिनदार :
शांताराम जाधव

संयुक्त कार्यवाह :
सुनिल जाधव
मंगल पांडे
उत्तमराव इंगळे
मुजफ्फर अली सय्यद
प्रकाश बोराडे

संदर्भ क्र.: एम.एस.के .ए./ दिनांक :

१३.पुरुष व महिला खेळाडूंना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.तसेच गणवेश बदलण्यासाठी स्वतंत्र सोय असावी.

१४.पुरूष, महिला खेळाडू व प्रेक्षक यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय असावी.

१५.खेळाडू निवास्थानी विद्युत पुरवठा व मुबलक पाण्याची सोय असावी.त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

१६.निरीक्षक, पंचप्रमुख व पंच यांना व्यासपिठावर बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

१७.राज्य संघटनेचे पदाधिकारी, शासकीय समिती व कार्यकारी मंडळाचे सदस्य यांनी स्पर्धेला भेट दिल्यास त्यांना व्यासपिठावर सन्मानपूर्वक आसन व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.

१८.स्पर्धा प्रवेश वर्गणी प्रति स्थानिक संघास रु.२००/- व व्यावसायिक संघास रु.५००/- पेक्षा जास्त घेता येणार नाही.

१९.स्पर्धेत सहभागी झालेल्या संघाचे प्रवेश अर्ज जिल्हा कार्यवाहची सही व संघटनेच्या शिक्यानिशी भरलेले असावेत व त्यावर निरीक्षकाची स्वाक्षरी घेणे जरूरीचे आहे. संपूर्ण स्पर्धेवर निरीक्षकाचे मार्गदर्शन बंधनकारक राहील.

२०.स्पर्धेसाठी तक्रार निवारण समिती स्पर्धा सुरु होण्यापूर्वी जाहिर करावी. सदर समितीमध्ये निरीक्षक, पंचप्रमुख यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

२१.सामने कार्यक्रम पत्रिका (ड्रॉ), गटविभागणी व बाद पद्धतीचे सामने पत्रिका स्पर्धा सुरु होण्यापूर्वी संघांना देण्यात यावी व त्यावर संघटन सचिव, स्पर्धा निरीक्षक यांची नांवे आणि सही असणे आवश्यक आहे.

२२.स्पर्धेकरीतां नियुक्त केलेल्या पंचांपेक्षा कमी पंच असतील तर संघटनेचे निरीक्षक, पंच प्रमुख व जिल्हा सचिव यांनी त्याबाबत अंतिम निर्णय घ्यावा.

२३.राज्यस्तरीय स्पर्धेकरीता एक निरीक्षक, एक पंचप्रमुख व सहाय्यक पंचप्रमुख पाठविला जाईल. प्रत्येक क्रीडांगणांवर पाच प्रमाणे राज्य संघटनेतर्फे पंचांची नियुक्ती केली जाईल. एक क्रीडांगणासाठी तीन पंचांची नियुक्ती जिल्हा असोसिएशनतर्फे राज्यस्तरीय पंच परीक्षा पास झालेल्या पंचाची करावी.

२४.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येणारे खेळाडू, पंच व अधिकारी यांच्यासाठी स्पर्धा संपल्यावर परतीच्या प्रवासाच्यावेळी स्टेशन व एस.टी.स्टँड येथून त्यांना आणण्यासाठी व परत पोहोचविण्यासाठी बस अथवा इतर वाहनांची सोय असावी.

वरील सर्व नियम व अटींचे पालन न केल्यास आपल्याला स्पर्धा आयोजनासाठी दिलेली परवानगी रद्द करण्याचा अधिकार संघटनेने नियुक्त केलेल्या निरीक्षकास राहील. नियम व अटींची पूर्तता न केल्यामुळे व काही करणास्तव स्पर्धा रद्द झाल्यास स्पर्धेत सहभागी झालेल्या संघांचे व निरीक्षक,पंचप्रमुख,सहाय्यक पंच व पंच यांचे संपूर्ण प्रवास भाडे संयोजकांना द्यावे लागेल.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन दादर मुंबई २८.

प्रा.संभाजी पाटील,
प्र.सरकार्यवाह.

Scanned with CamScanner